
ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal



*Chief Editor*

**Dr Kalyan Gangarde**

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

Vol. 3 No. 5 October 2017

(UGC Approved Journal No. 63716)

Impact Factor: 3.012 (IIJIF)

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies

*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade**
Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

***Co- editors***
Dr. Sadhana Agrawal (Gwalior)
Pandurang Barkale (Mumbai)
Dashrath Kamble (Kalyan)
Bharat Gugane (Nashik)

**MGEW SOCIETY'S**
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES**
**KALYAN (MAHARASHTRA)**
Contact: +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# CONTENTS

From the Editor's Desk......... | 4

1. Adventure' As Trope: Indian Children's Literature in English / **Riyaz Ahmad Kumar | 5**

2. Ushering the Marginalized Into the Mainstream through Task Based Language Teaching / **Chumki Biswas | 7**

3. What Is Morphology In English Language Teaching (Elt) ?/ **Prakash S. Chauhan | 11**

4. Feminist Concepts In The West: Theories, History & Dynamics / **Geeta Sahu | 14**

5. Asymmetrical Federalism And Accommodation In India / **M.Shafi Bhat | 18**

6. Social Realism in Manju Kapur's Novel 'Custody' / **Kadam K.R. & Dr. Gangane A.S. | 28**

7. अनुवादप्रक्रिया | डॉ.सुरेश शिंदे | 30

8. आंबेडकरवादी स्वकथनातील वेदना : एक दृष्टीक्षेप | डॉ.सा.द.सोनसळे | 40

9. विश्वमंच पर हिंदी | डॉ. अपर्णा पाटील | 44

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (SJIF)

8.

# आंबेडकरवादी स्वकथनातील वेदना : एक दृष्टीक्षेप

प्रा.डॉ.रा.द.सोनसाळे
सहयोगी प्राध्यापक मराठी
रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

अस्पृश्यांच्या आत्मकथा केवळ दुःख, दैन्य,मुकाटपणे मांडण्याचे साधन नाही. आंबेडकरवादी साहित्यात इतर वाडमय पकार जे आहेत. त्या वाडमय पकारात अस्पृश्यांच्या पहिल्या पिढीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सक्षम साहित्य निर्मीती केली. आणि म्हणून समाजाला एक उर्जीत अवस्था प्राप्त झाली आहे. आंबेडकरवादी साहित्य हे मानवमुक्तीचा आशयगर्भीत वाडमयाला लढते. त्या अनुशंगाने साहित्यनिर्मिती सुध्दा होत असते. रंगेल आणि रंजनप्रधान आशयगर्भीत वाड.मयाला आंबेडकरवादी साहित्य हा विचार नाकारले. आंबेडकरवादी साहित्याची बांधिलकी स्वांतंत्र, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यावर आधारीत असलेल्या विचारसरणीशी बांधिल आहे.

आंबेडकरवादी साहित्याचा व्याख्या वेगवेगळया विचारवंतानी केल्या आहेत. तरी एक सर्वसाधारण व्याख्या करता येईल 'समगव्यवस्थेचा' समग्र शोशित म्हणजे दलित आणि त्यांनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य. दलित साहित्यानुभव आणि जाणिवेच्या पातळीवरून लिहीले जाते. या बाबतही काहीशी मतभिन्नता दिसते. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की दलितेतर लेखक आणि दलित लेखक यांच्या अनुभव घेण्याच्या शक्तितच फरक आहे. दलितेतरांचा अनुभव संकल्पनात्मक आहे तर दलित लेखकांचा अनुभव संवेदनात्मक असतो. व दलित जाणिव असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवन विशयक जे वाड•मय निर्माण होते ते दलित वाड•मय यावरून असे लक्षात येते की, केवळ दलित असूनही चालत नाही तर जन्मांचे दलित असण्यापेक्षा जाणिवेने दलित होने हे ही महत्वाचे आहे. परंतु दलित माणूस जेवढया वास्तव पातळीवर न्यायाच्या भूमिकेतून आपले अनुभव दृग्गोचर करू शकतो लेखक एका पातळीच्या पुढे सरकू शकत नाही. अनुभवातील अस्सलता जावे त्याच्या वंशी तेंव्हा कळे.

आंबेडकरवादी साहित्याने सुरूवातीला कविता मोठया प्रमाणात लिहीली. 1952–1953 ला मोठया प्रमाणात कथा,वैचारिक वाड•मय येताना दिसते. आणि म्हणून 1956 पर्यंत अ.पा. रणपिसे यांचा लेख 'दलित साहित्य संघ' हया वरून 1956 पर्यंत एक वेगळे साहित्य सम्मेलन घेण्याइतपत साहित्य निर्माण झाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य सम्मेलनाचे उद्घाटक होते पण त्यांच्या महानिर्वाण नंतर 1958 ला दलित साहित्य सम्मेलन झाले अण्णाभाऊ साठेंनी उद्घाटन करून "पृथ्वी शेषाच्या फण्यावर तरली नसून ती श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे." असे क्रांतीकारी विचार व्यक्त केले.तत्पूर्वी विदर्भ साहित्य संघाच्या मंचावर बाबासाहेब परिवर्तनवादी साहित्यांना नवी दृष्टी दिली ते म्हणतात. 'तुमची दृष्टी चार भिंती पुरती मर्यादित ठेऊ नका तीला व्यापक करा या जगात उपेक्षितांचे फार मोठे विश्व आहे. त्याला समजून घ्या त्यांचे दुःख, दरिद्रय मांडा हा बाबासाहेबांनी साहित्यिकांना उपदेश केला. आजपर्यंत जे साहित्यात आले नाही ते करण्याचा संदेश बाबासाहेब साहित्यिकांना देतात. ही आंबेडकरवादी साहित्याची सुरूवात आहे. ती इतरत्र कुठेही नाही.

कथा, कविता, कादंबरी, नाटकानंतर फुले आंबेडकरी विचारधारेचा साहित्यिक आत्मकथनं लिहू लागला. आपण जगलेले, अनुभवलेले, भोगलेलं मांडू लागला अगदी मनमोकळेपणाने.

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

युगानुयुगाचे साचलेले अनुभव जगासमोर खुले करू लागला. सुरूवातीला ह्या साहित्याची दुर्गंधी मध्यम वर्गियांना येवून साचलेले अनुभव जगासमोर खुले करू लागला. सुरूवातीला ह्या साहित्याची दुर्गंधी मध्यम वर्गियांना येवू लागली. पण आत्मकथनांचे स्वागतच फार मोठया प्रमाणात होवू लागले. हे प्रस्थापित वर्गाच्या लक्षात येताच त्याने सूर बदलला आणि मग सर्वात पुढे होवून त्यावर समीक्षा करू लागला. त्याला पुरस्कार देवू लागला. परिणाम असा झाला की, एका पाठोपाठ एक अशी मराठीला अनभिज्ञ असणारी वाक्य रचना, शब्द रचना, नवे व्याकरण, नवे अनुभवविश्व, नवीशैली घेवून आत्मकथनं येवू लागली. अस्पृश्या बरोबर बहुजन, आदिवासी आणि यिां लिहू लागल्या. त्याला भारतीय राज्यघटनेने दिलेले लेखन आणि विचार स्वातंत्र्य हा ही एक भाग होता. स्वातंत्र्यामुळे लोकशाही आली आणि लोकशाही मुळे आत्मभान आले. जाणीव जागृती आली. गावकुस अस्वस्थ झाले. प्रस्थापित मराठी समीक्षेच्या चौकटी कुचकामी ठरल्या. अशा वेळी प्रचंड ताकदनिशी निर्माण होणा—या साहित्याला कुणी रोखू ही शकत नव्हते.

सर्व प्रथम अस्मितादर्श मधून प्र.ई. सोनकांबळेचे 'आठवणींचे पक्षी' हे कमाने प्रसिध्दीस आले. पण त्यांचे पुस्तक यायला वेळ लागला तेवढयात दया पवारांनी 'बलुतं' पुस्तक रूपाने प्रकाशित केले. पहिले आत्मकथन प्र.ई. सोनकांबळेचे आहे पण, पुस्तक रूपात आलेले आत्मकथन दया पवारांचे आहे.

अस्पृश्यांनी आपल्या पिढयांपिढयाच्या खोल जखमा ज्या सतत भळभळतात त्या शब्द बध्द केल्या. वेद ऋचा पेक्षाही वेदनेच्या ऋचा अधिक प्रभावी ठरल्या. चतकोर भाकरीरसाठी फोडावी लागलेली गाडीभर लकडे,गळयात मडके आणि कमरेला झाडू बांधून हातात घुंगराची काठी एका हातात पोट पोशिंदा दुरडी, अंगावर फाटकी लक्तरं हे सारं अपमानीत जीणं. कोणत्या पिढी पासून भोगत होते कुणास ठावूक? गुलामीला अध्यात्माचा, धर्माचा संदर्भ देणारा माणूस आत्मकथनाने अवाक झाला. त्याच्यासाठी हे विपरीत होते. आता जग बुडणार म्हणून त्याने अंतरमनात आक्रोशही केला असेल पण हे झाले.

महार अस्पृश्यां दुःखला मर्यादा नव्हती हे सांगताना दया पवार बलुतं मध्ये म्हणतात " महारांच्या कामाला तसं काही टाइम–टेबल नव्हतं. सतत चोविस तास बांधलेला. पडल्या कामाचा चाकर तिला बिगार म्हणतं.....गावचा सगळा सारा तालुक्याला घेवून जाणे, गावात आलेल्या बडया अमलदाराच्या घोडयापुढं धावणे, त्याच्या जनावराची देखभाल करणे, चारापाणी घालणे, गावाची यात्रा वाजवणे, नवरा वेशीवर ओवाळणे इ. कामं महारांची होती याबद्दल मिळायचं काय ? तर बलुतं" 3 यावरून लक्षात येते की दलित माणसाच्या जीवनात किती वेदना होत्या.

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात सुध्दा जगण्याची दाहकता सांगताना लेखक सांगतात, "हुरडा खायला मास्तर सोबत गेल्यावर माळी समाजाचा शेतावरचा गडी मज्यावर डोळे वटारू लागला." 4 किंवा "अर्ध्या भाकरीसाठी पाटलीन बाईच्या वतलातलं नासलेलं कुत्र टाकायला सांगतात अन कुत्र्याचं शेपुट धरून वडाय गेलो तर शेपुटच हातात आलं. तसच नासलेलं कुत्र. गावातून नेताना सगळे लोक नाकाला पदर लावू लागले." 5 अस्पृश्यांना पोटासाठी अपमानीत आणि घाणीची कामे करावी लागत. घान उचलूनही सवर्ण समाज कमी समजतो. ही दुःखची जखम खोल खोल जाताना दिसते.

लक्ष्मण मानेनी 'उपरा' मधून भटक्याचे जीवन अधोरेखीत केले छोटा लक्ष्मण पंधरा दिवस पालं शोधत जातो. आज इथं तर उद्या तिथं हे काटयावरची पोटं भरण्यासाठी उचलेपणाने जगावं लागतं. कपाळावर चोर म्हणून शिक्का बसलेला. लक्ष्मण माने सांगतात. "हगनदारीला आमची पालं असतात गू घान जीवन जगावं लागत. हा साक्षात नरकवास आहे." (6) देश आपला, स्वातंत्र्य गिळालं पण कुणासाठी आहे ते या देशाचे मूळ भूमीपुत्रच उपक्षीत उपरे आहेत.

'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या आत्मकथनात माधव कोडंविलकर सांगतात की," कातडयाचा वास नखांना येतो. डोक्यावर कातडं

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

घेवून जाताना दुर्गंधी येते लोक नाक धरून जातात आम्ही मात्र जीवन म्हणून जगतो."(7) या वेदना दुःखाचे सार्वत्रिकरण करतात. या देशाने धर्माने दिलेला पिढीजात धंदा विना तक्रार करावाच लागतो. म्हणून बाबूराव बागूल म्हणतात.

"ज्याने चूक केली इथे जन्म घेण्याची

ती त्यानेच सुधारली पाहिजे

देश त्यागून अथवा निषण युध्द करून" 8

जातीचा व्यवसाय नाकारायचा असेल तर करावं लागेल अथवा देश सोडून जाव लागेल.

दलित पुरुषा प्रमाणे अस्पृश्य स्त्रियांनी ही आत्मकथनं लिहीली त्यात 'माझ्या जल्माची चित्तर कथा' शांताबाई कांबळे यांनीही दलित बरोबर स्त्री म्हणून ही समस्या मांडलेल्य आहेत त्याचप्रमाणेच बेबी कांबळे यांनीही 'जिणं आमुचं' या आत्मकथनात " दुकानावरचा दुकाणदार पैसे घेवूनही सामान दुरून फेकायचा.

डोक्याच्या झिंज्या झाल्यावर त्याला तेलं मिळायचं नाही तेव्हा नारळाची वाटी चाटून हातावर थंकायच अन् ते डोक्याला लावायचं. दहा बायकात एक तरी बाई नाक कापलेली असायची. पायात खोडा घालून जगावं लागे. लोकांच्या घरी खालया काई नसायचं तवा वाळलेल्या चाण्या खालच्या. बाळातीण बाईला एकदा आळया पडलेला जनावराचे मांस खावे लागले." असे कितीतरी प्रसंग येतात.

उत्तम बंडू तुपे यांचे "काट्यावरची पोटं" शरण लिंबाळे यांचे 'अक्कर माशी' ना.सि. झोगडे यांचे 'फांजर' प्रा. कुमुद पावडे यांचे 'अंतःस्फोट' दादासाहेब मोरे यांचे 'गबाळ' शंकरराव खरातांचे 'तराळ अंतराळ' रूस्तुम अचलखांब यांचे 'गावकी' पार्थ पोळके यांचे 'आभरान' श्रीरंग तलवारे यांचे 'धुळपाटी' प्रा. तुशार भाग्यवंत यांचे कोंडाळ ल.स. रोकडे यांचे 'झळ' पांडूरंग उमाजी जाधव यांचे 'मा–हुडा' लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या' भीमराव गस्ती यांचे 'बेरड' ना.म. शिंदे यांचे 'जातीला जात वैरी' बाळासाहेब गायकवाड यांचे 'खिरती महार' जनाबाई गि–हे यांचे 'मरण कळा' किशोर काळे यांचे 'कोल्हाट्याचे पोर' मंगे सुगंध यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात' केशव मेश्राम यांचे 'हकिगत आणि जटायू' राम दोतोंडे यांचे 'जेव्हा याधी बोलू लागते' आर.के. त्रिभूवन यांचे 'द दान सुट गि–हाण' वैजनाथ कळसे यांचे 'एरणीच्या घणा प्रल्हाद चेंदवणकरांचे 'टाच' नरेंद्र जाधव यांचे 'ढगा आडचा चंद्र' रामराव झुंजारे यांचे 'झुंज रतनलाल सोनग्रा यांचे 'सोनजातक', नजुबाई गावीत यांचे 'आदोर' ह्या आत्मकथेतून अस्पृश्याच्या पिढयांपिढया सत्ता, संपती, सन्मना पासून वंचित राहिलेला हा समाज पोटासाठी दाहीदिशा भटकणारा, पाण्यासाठी लाचार असणारा, घोडयापुढे पळणारा, सवर्णांचे जोडे डोक्यावर वागवणारा, दगडांच्या वस्तू बनविणारा, झाडू, संबू बनविणारा, घानीशी संमंधीत कामे करणारा, हजारो वर्षांच्या वर्णवस्थेचा पाईक, जातीव्यवस्थेने ज्यांच्या हजारो पिढया बरबाद केल्या. त्या उध्दवस्त करणाची कहाणी म्हणजे दलित आत्मकथा दलित आत्मकथनावर एकसूरीपणाचा आरोप करणारा मनूवादी दृश्टीकोण जातीयवाद्या बरोबर ब्राम्हणाळलेल्या दलितात ही वाढत आहे. अजून लाखो माणसाच्या वेदना शब्दबध्द झाल्याच नाहीत. चळवळ रोखण्यासाठी हा मनुवादी डाव घातला. आणि तो कमालीचा यशस्वी झाला. दलित आत्मकथा दलितांच्या अंगोपागांवर खोलखोल झालेल्या जखमा आहेत. आजपर्यंत मांडण्यात आलेल्या अनुभवा पेक्षा कितीतरी अनुभव नव्या आत्मकथाकरांची प्रतीक्षा करत आहेत. आजपर्यंत मांडण्यात आलेल्या अनुभवा पेक्षा कितीतरी अनुभव नव्या आत्मकथाकारांची प्रतीक्षा करत आहेत. माझे अनुभव माझे राहतील ते इतरांपेक्ष वेगळया रूपात ही असतील ते आले पाहिजेत. व्हाईट कॉलरच्या दलितांना त्याची लाज वाटते पण, जे भोगलेलं आहे ते नाकारण्यात काय अर्थ आहे. "जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाहीत" 10 असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत. मध्यम वर्गीय समीक्षक म्हणतात म्हणून आत्मकथा एकसूरी झाली ती बंद पाहिजे म्हणून बंद करायची काय मग

प्रस्थापीतांच्या ईशा–यावर दलित साहित्य मार्गकमण करणार असेल तर भवितव्य अंधारात आहे. प्रस्थापित सतत संभ्रम निर्माण करतात. ते त्यांच्यातल्या वासनांध प्रेमावर कालीदासापासून तांबे–महानोरा पर्यंत लिहले गेले ते मात्र चालते. राधाकृश्णाचा विलास, सीतास्वयंवर, गौळणी, विरहीणी, ह्यावर कितीही लिहीले तरी चालते. पण दलितांची पंचविस वर्शातली आत्मकथनं एकसूरी वाटत आहेत. सवर्णानी दलितांचीच काय संपूर्ण बहुजनांचीच कविता मातीत घातली. कवींची टिंगल टवाळी करून, कविता संग्रहाची टिंगल करून काव्य लेखन बंद पाडले–आत्मकथा बंद पडेल मग कथा, कादंबरी, नाटक थंडावेल, मग दलित लेखन निश्क्रिय झाला म्हणायला ते मोकळे आहेत. जगात लोकसंख्या वाढली म्हणून आपण आपल्यापोटी बाळाला जन्म देणार नाही काय. प्रस्थापितांच्या धुर्त सूचना कडे लक्ष न देता आपण धुमधडाक्यात जे वाड्.मय प्रकार लिहावा. वाट्टेल तो लिहावा. मराठीच्या मध्य वर्गीय समीक्षाचे मानदंड, मापदंड दलित–बहूजनांचे साहित्य स्वीकारत नाहीत. उक कोल्हा एकसूरी बदल सूर काढू लागला की कळो की न काळो इतर ही कोल्हेकुई करतात. पण हे सृजनशील लेखकाने लक्षात घेवू नये. काहीच न लिहण्यापेक्षा काहीतरी लिहावे हे उत्तम आहे.

□□□

**संदर्भ ग्रंथ :**

1. डॉ. फडके, भालचंद्र – दलित साहित्य:वेदना आणि विद्रोह पृ.27
2. मुक्तिबोध, शरदच्चंद्र – मुलाखत:गो.म. कुलकर्णी समुचित ए.मे.जू.1985 पृ. 102 ते 111
3. पवार दया – बलुतं पृ.40
4. सोनकांबळे, प्र. ई. – आठवणींचे पक्षी – 48
5. कित्ता – आठवणीचे पक्षी 49
6. माने, लक्ष्मण – 'उपरा'
7. कोंडविलकर, माधव – मुक्काम पोस्ट; देवाचे गोठणे
8. बागुल, बाबूराव – दलित साहित्य:कांती विज्ञान
9. कांबळे, बेबी – जिणं आमुचं.
10. कांबळे, शांताबाई– माझ्या जल्माची चित्तरकथा

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani